| अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅंट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजन | | |
|---|---|---|
| १. | सेवेचे नाव/ उपक्रम(विषय) . | अल्पसंख्यांकांच्या कल्याणासाठी म.प्रधानमंत्री यांनी१५ कलमी कार्यक्रमाअंतर्गत अल्पसंख्यांक समाजातील इयत्ता १ली ते १० वी च्या सर्व शासकीय निमशासकीय खाजगी शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मॅंट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना केंद्र शासनाने सुरु केली आहेशासन निर्णय दिनांक २३ जुलै २००८ नुसार इयत्ता १ली ते १० वी पर्यंतच्या अल्पसंख्यांकसमाजातील विद्यार्थ्यांसाठी सन २००८-०९ पासुन सदरची योजना नव्याने राज्यात सुरु करण्यात आलेली आहे. अल्पसंख्यांक समाजामध्ये केंद्र शासनाने मुस्लीम,ख्रिश्चन,शिख,बौध्द व पारशी या धर्माचा समावेश केलेला आहे. |
| २. | त्याची आवश्यकता काय आहे | १.अल्पसंख्यांक समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना इयत्ता १ली ते १० वी पर्यंत शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे.<br>२.विद्यार्थ्यांची मोठया प्रमाणावर होणारी गळती थांबावी.<br>३.अल्पसंख्यांक पालकांना त्यांच्या पाल्यास शाळेत पाठविण्यासाठी उत्तेजन देण्यासाठी<br>४.अल्पसंख्यांक मुलांच्या पालकांचा त्यांच्या पाल्यांचा शिक्षणावर होणाऱ्‍ खर्चाचा भर कमी करणे. |
| ३. | कोणत्या नियमानुसार कार्यवाही केली जाते | शासन निर्णय क्रमांक पपंका२००७/(२७०/०७) केपुयो दिनांक२३/०७/२००८ नुसार कार्यवाही केली जाते. |
| ४. | कोणत्या कार्यालयाशी संपर्क करावा | मुख्यध्यापकांमार्फतशिक्षणाधिकारी(माध्यमिक)/शिक्षणाधिकारी(प्राथमिक)/शिक्षणाधिकारी(निरंतर) जिल्हापरिषद. |
| ५. | माहितीसाठी अर्ज कशाप्रकारे असावा | केंद्र शासनाने दिलेल्या विहित नमुन्यात करणे आवश्यक आहे. |
| ६. | अर्ज कोठे सादर करावा | शाळेमार्फत संबंधित जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी(माध्यमिक)/शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/शिक्षणाधिकारी(निरंतर) जिल्हा परिषद. ( www.escholarship.maharashtra.gov.in ) |
| ७. | सेवा मिळण्यास कालावधी | विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर सद विद्यार्थ्याने बॅंकेच्या खात्याबाबतची माहिती तसेच नॉन ज्युडिशिअल स्टॅंप पेपर वर उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर संचालनालयाच्या स्तरावरूनबॅंकेमार्फत शिष्यवृत्ती वितरीत करण्यात येते. |
| ८. | उपक्रमाची माहिती न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोठे अर्ज करावा | शाळेकडून संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकाऱ्यामार्फत संचालक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणेयांचेकडे साधावा. |

| अ.क्र. | नाव | वसतिगृहात राहणारे विद्यार्थी | वसतिगृहाबाहेरील विद्यार्थी |
|---|---|---|---|
| १ | प्रवेश शुल्क इयत्ता ६ वी ते १० | रु.५००/- प्रती वर्ष प्रत्यक्षात असलेल्या शुल्काच्या मर्यादेत | रु.५००/- प्रती वर्ष प्रत्यक्षात असलेल्या शुल्काच्या मर्यादेत |
| २ | शिक्षण शुल्क इयत्ता ६ वी ते १० | रु.३५०/- प्रतीमाह प्रत्यक्षात असलेल्या शुल्काच्या मर्यादेत | रु.३५०/- प्रतीमाह प्रत्यक्षात असलेल्या शुल्काच्या मर्यादेत |
| ३ | परिरक्षण भत्ता शैक्षणिक वर्षातील १० महिन्याकरिता अनुज्ञेय<br>इयत्ता १ ली ते ५ वी<br>इयत्ता ६ वी ते १० | <br><br>रु.६००/- प्रतीमाह प्रत्यक्षात असलेल्या शुल्काच्या मर्यादेत | <br><br>रु.१००/- प्रतीमाह<br>रु.१००/- प्रतीमाह |